**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकिय व्यवसाय शिक्षण संस्था,
**PRE-IAS TRANING CENTER**
**हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी.एम. स्टेशन जवळ,मुंबई ४०० ००१.**
**दूरध्वनी क्रमांक :-०२२-२२०७०९४२ Email: siac1915@gmail.com Web:www.siac.org.in**

---

## प्रसिद्धीपत्रक

**महाराष्ट्र राज्यातील होतकरू व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजना**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या राज्यातील होतकरू व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृतीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय दिनांक १६.०४.२०१६ व दिनांक १३.११.२०१७ अन्वये शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. उमेदवारास या योजनेचा भागनिहाय लाभ फक्त एकदाच अनुज्ञेय राहील. तरी भाग १ करिता निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून फक्त Online पद्धतीने अर्ज दिनांक १२.०६.२०१८ ते दिनांक २२.०६.२०१८ पर्यंत **या संस्थेच्या www.siac.org.in या संकेतस्थळावर** मागविण्यात येत आहेत.

**सविस्तर जाहिरात, निकष, पात्रता, अटी-शर्ती व Online अर्ज भरण्याबाबतची माहिती या संस्थेच्या www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**sd/-**
संचालक
**डॉ. एम. बी. भिडे**

**महाराष्ट्र शासन**

राज्य प्रशासकिय व्यवसाय शिक्षण संस्था,
**PRE-IAS TRANING CENTER**
**हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी.एम. स्टेशन जवळ,मुंबई ४०० ००१.**
**दूरध्वनी क्रमांक :-०२२-२२०७०९४२ Email: siac1915@gmail.com Web:www.siac.org.in**

---

**महाराष्ट्र राज्यातील होतकरू व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजना**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या राज्यातील होतकरू व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृतीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय दिनांक १६.०४.२०१६ व दिनांक १३.११.२०१७ अन्वये शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. उमेदवारास या योजनेचा भागनिहाय लाभ फक्त एकदाच अनुज्ञेय राहील. तरी भाग १ करिता खालील **निकष, पात्रता, अटी व शर्ती** याची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून दिनांक १२.०६.२०१८ ते दिनांक २२.०६.२०१८ पर्यंत फक्त Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

**पात्रतेच्या अटी:**

१. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत असावे.
३. मागील तीन म्हणजे सन २०१५,२०१६ किंवा २०१७ या वर्षांमध्ये किमान एक वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि,अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न झालेला उमेदवार
४. उमेदवाराने अर्जासह महाराष्ट्र राज्याचे रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Cerificate),उमेदवाराने ज्यावर्षी मुख्य परीक्षा उत्तीर्ण केली आहे त्या वर्षाचे प्रवेशपत्र (Hall Ticket), जोडणे आवश्यक आहे.
५. शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवारास प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा- २०१९ ला देणे बंधनकारक असेल, अन्यथा शिष्यवृत्तीची रक्कम एकरकमी शासनास परत करण्यात येईल अशा आशयाचे रु.१०० चे स्टॅम्प पेपर वर बंधपत्र देणे बंधनकारक असेल.

**भाग १ करिता योजनेचे स्वरूप :-**

१. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सन २०१९ च्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना त्या वर्षीच्या मुलाखतीपर्यंतच्या कालावधीसाठी दिल्ली येथील **SRIRAM's IAS** या प्रशिक्षण संस्थेमध्ये भाग- १ करिता प्रवेश देण्यात येईल.
२. विहित मुदतीत जाहिरातीस प्रतिसाद देणाऱ्या उमेदवारांना विहित अटींच्या अधीन राहून सदर शिष्यवृत्ती देण्यात येईल.
३. प्रवेशित उमेदवारांचे प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून या संस्थेमार्फत सदर प्रशिक्षण संस्थेस अदा करण्यात येईल.
४. सदर शिष्यावृतीचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक उमेदवारास दिल्ली येथील त्याच्या प्रशिक्षणाच्या वास्त्यव्याच्या कालावधीसाठी उपस्थितीनुसार रु.१०,०००/- प्रति माहे प्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येईल.
५. सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणारा उमेदवार पूर्व/मुख्य परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याची शिष्यवृत्ती त्यावर्षाकरिता समाप्त करण्यात येईल.
६. उमेदवाराने या संस्थेस प्रशिक्षण संस्थेमार्फत मासिक उपस्थिती अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

**Online पद्धतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी**

दिनांक १२.०६.२०१८ ते दिनांक २२.०६.२०१८ या कालावधीत फक्त **Online** पद्धतीने अर्ज सादर **www.siac.org.in** या संकेस्थळावर करणे आवश्यक आहे.
दिनांक २५.०६.२०१८ ते २७.०६.२०१८ या कालावधीत अर्जांची छाननी.
दिनांक २८.०६.२०१८ रोजी निवड झालेल्या विद्यार्थांची यादी प्रसिध्द करणे.
दिनांक ०२.०७.२०१८ ते ११.०७.२०१८ या कालावधीत दिल्ली येथील श्रीराम आय.ए.एस. येथे प्रत्यक्ष प्रवेश घेणे. सदरच्या कालावधीत प्रवेश न घेतल्यास आपले नाव प्रवेश यादी मधून आपोआप रद्द होईल. दिनांक १२.०७.२०१८ पासून प्रशिक्षण सत्रास सुरवात होईल.

संचालक
**डॉ. एम. बी. भिडे**

# <u>बंधपत्र चा नमुना</u>

**शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक: प्रीआय-५४१५/प्र.क्र.१९२/मशि-२**
**दिनांक १६.०४ २०१६ अन्वये सादर करावयाचे बंधपत्र**

मी, श्री./श्रीमती/कुमारी__________________________________________राहणार

_____________________________________________________________

वय _______याद्वारे असे लिहून देतो/देते की माझी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या दिल्ली येथील **SRIRAM's IAS** या खाजगी प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड झालेली असून प्रशिक्षण घेतल्यानंतर मला केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा - २०१९ देणे बंधनकारक असेल, अन्यथा मला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम एकरक्कमी शासनास परत करेन याबाबत सदरचे बंध पत्र देत आहे.

ठिकाण :

दिनांक :

(सही )

(नाव)

(टीप:- सदर बंधपत्र रु.१०० चे स्टॅम्प पेपर नोटरी करून प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसाच्या आत **राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई** येथे सादर करणे बंधनकारक असेल.)